# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **उत्तन येथील घनकचरा प्रकल्प परिसरात जपानी मियावाकी संकल्पनेतून विकसित केलेल्या शहरी जंगल/उद्यानाचा लोकार्पण सोहळा मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या हस्ते संपन्न**
- **मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील हरित पट्टा वाढविण्याच्या आणि पर्यावरण संतुलन साधण्याच्या उद्देशाने महापालिका राबवणार ५०,००० वृक्ष लागवडीचा व्यापक उपक्रम**

दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी उत्तन येथील घनकचरा प्रकल्प परिसरात जपानी मियावाकी संकल्पनेतून विकसित केलेल्या शहरी जंगल/उद्यानाचा लोकार्पण सोहळा मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आला. मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील हरित पट्टा वाढविण्याच्या आणि पर्यावरणीय संतुलन साधण्याच्या उद्देशाने ५०,००० वृक्ष लागवडीचा व्यापक उपक्रम राबवत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील हवेतील प्रदूषण कमी करणे, दुर्गंधी नियंत्रण आणि शहराचे सौंदर्य वृद्धिंगत करणे हा असून, नागरिकांमध्ये वृक्ष लागवडीची संस्कृती रुजविणे हे या मोहिमेचे ध्येय आहे.

या व्यापक हरित उपक्रमाचा एक भाग म्हणून मिरा-भाईंदर महानगरपालिकेने उत्तन येथील घनकचरा प्रकल्प परिसरात सुमारे ८,६०० वृक्ष लागवड करून एक अद्वितीय पाऊल उचलले आहे. या उद्यानात भारतीय आणि विशेष करून ४९ स्थानिक प्रजातींची वृक्ष लागवड करण्यात आली आहे. कचरा व्यवस्थापन केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात हरित क्षेत्र निर्माण करून, पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधता वाढविण्याच्या दृष्टीने ही मोहिम एक आदर्श निर्माण करत आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी केशव श्रुष्टी संस्थेमार्फत करण्यात आली असून, HDFC लाइफ यांच्या CSR निधीच्या माध्यमातून हा उपक्रम साकार करण्यात आला आहे. लोकार्पण कार्यक्रमानंतर मा. आयुक्त, केशवसृष्टी संस्थेचे प्रतिनिधी, HDFC लाइफ यांचे प्रतिनिधी, महापालिका शाळेतील विद्यार्थी आणि महापालिका कर्मचाऱ्यांनी वृक्ष लागवड करून पर्यावरण जतनचा निर्धार केला.

लागवडीपूर्वी जागेची स्वच्छता करून ३ फूट खोलीपर्यंत खोदकाम करून जमिनीची समतोलता राखून त्यावर १.५ फूट लाल मातीचा थर देण्यात आला. त्यावर माती व शेणखत मिश्रण टाकून पुन्हा समतोलता राखण्यात आली. त्यानंतर झाडांच्या रांगा आखून संगठित पद्धतीने लागवड करण्यात आली. प्रत्येक खड्ड्यात नीम, कोकोपीट आणि वर्मीकंपोस्टचे मिश्रण देऊन झाडांना आवश्यक पोषण पुरवण्यात आले आहे. तसेच, लागवडीनंतर झाडांची वाढ निरंतर आणि आरोग्यदायी राहावी यासाठी ठिबक सिंचन प्रणाली बसविण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका, केशव श्रुष्टी आणि HDFC लाइफ यांच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात आलेला हा उपक्रम प्रदूषण नियंत्रण, जैवविविधता संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्यदायी भविष्याकडे वाटचाल यांचे मूर्त रूप आहे. विविध स्थानिक वृक्ष प्रजातींच्या लागवडीमुळे पुढील काही वर्षांत मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात हरित आवरण वाढेल, हवा स्वच्छ होईल आणि पर्यावरण अधिक सक्षम बनण्यास मदत होईल. तसेच, याप्रकारचे उपक्रम यशस्वी करण्यासाठी पीपीजी अर्थात पब्लिक, प्रायव्हेट आणि गव्हर्मेंट या तिघांचाही एकत्रित सहभाग असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वृक्ष लागवडी नंतर त्याचे जतन आणि संवर्धन करणे ही तितकच महत्वाचे आहे असे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी सांगितले.